**सेशन केस क्र ११ सन २०१८** **निशाणी ४८**

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ५ ची साक्ष
मी या द्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,
माझे नाव - कोंडाजी दत्तु गभाले,
वय सुमारे - ५७ वर्ष
उद्योग - नोकरी
निवास स्थान - शिर्डी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर.

**इन कॅमेरा**

**सरतपासणी - सहायक सरकारी वकील श्री. जे. के. दिवटे यांचेतर्फे -**

१. सन २०१७ साली मी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, संगमनेर येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. घारगांव पोलीस ठाण्याचा गु.र.नं. १३१/२०१७ मधील जप्त मुद्देमाल सिलबंद पाकीट हे वैद्यकिय अधिकारी, घुलेवाडी ग्रामीण रूग्णालय यांचेकडून घेवून ते न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नाशिक येथे दिनांक १४.१२.२०१७ रोजी नेवून दिले. त्याची पोहोच मी सदर प्रयोगशाळेकडून घेतली. मला आता ती पोहोच असलेले पत्र दाखविले. ते तेच आहे. त्यास **निशाणी क्र. ४९** दिला.

सरतपास पूर्ण.

**उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री जे. एच. वामन मार्फत**

२. पोलीस ठाण्यामध्ये मुद्देमाल खोली आहे. मुद्देमाल कारकून नेमलेला असतो. मुद्देमाल खोलीतून मुद्देमाल बाहेर काढतांना तो जावक रजिस्टरला नोंद केला जातो, हे म्हणणे खरे आहे. मुद्देमाल घेवून जाण्यासाठी मला लेखी आदेश नव्हता, हे म्हणणे खरे नाही. वैद्यकिय अधिकारी यांचेकडून मी मुद्देमाल न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नाशिक येथे घेवून गेलो, हे मी खोटे सांगतो, हे म्हणणे खरे नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

Sd/---

संगमनेर
दिनांक १५/१०/२०२५

( मंदार नेरलेकर )
अति. सत्र न्यायाधीश
संगमनेर